# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 13 June 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १३ जून २०२४ सायंकाळी ६.१०

****

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रधान सचिवपदी पी. के. मिश्रा, तर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारपदी अजित डोभाल यांची फेरनियुक्ती
- नीट–२०२४ परीक्षेत ग्रेस गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा, प्रवेश समुपदेशन थांबवण्यास सर्वोच्च न्यायालयाचा पुन्हा नकार
- नागपूरच्या हिंगणा तालुक्यातील धामणा इथं फटाका कारखान्यात भीषण स्फोट, सहा जणांचा मृत्यू, चौघं जखमी
- मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांचं उपोषण स्थगित, सरकारला एक महिन्याचा दिला वेळ

आणि

- राज्यसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे सुनेत्रा पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल

****

पंतप्रधानांचे प्रधान सचिव म्हणून निवृत्त प्रशासकीय अधिकारी डॉक्टर पी. के. मिश्रा यांची निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून अजित डोवाल, तर पंतप्रधानांचे सल्लागार म्हणून निवृत्त प्रशासकीय अधिकारी अमित खरे आणि तरुण कपूर यांची नियुक्ती झाली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निवड समितीनं या नियुक्त्यांना मंजुरी दिल्यानंतर यासंदर्भातलं पत्रक जारी करण्यात आलं.

****

सर्वोच्च न्यायालयानं राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा नीट-२०२४ संदर्भात प्रवेशसाठीचं समुपदेशन थांबवण्यास पुन्हा एकदा नकार दिला आहे. यासंदर्भात आज केंद्र सरकारच्या वतीनं राष्ट्रीय चाचणी संस्था-एनटीएनं आपली बाजू मांडली. वाढीव गुण मिळालेल्या १ हजार ५६३ उमेदवारांना फेरपरीक्षेचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात येईल. तसंच त्यांची गुणपत्रिका रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर, जे उमेदवार फेरपरीक्षेत सहभागी होणार नाहीत, त्यांना वाढीव गुणांचा समावेश नसलेली नवी गुणपत्रिका देण्यात येणार आहे, असं सरकारच्या वतीनं सांगण्यात आलं.

दरम्यान, नीट परीक्षेदरम्यान पेपरफुटी झाली नसून कोणताही भ्रष्टाचार किंवा गैरप्रकार झाला नसल्याचं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर ते आज बोलत होते. या प्रकरणासंदर्भात केंद्र सरकार सर्वोच्च न्यायालयाच्या दिशानिर्देशांचं पालन करेल असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

****

नागपूर शहरालगत असलेल्या हिंगणा तालुक्यातील धामणा इथं आज दुपारी फटाका बनवणाऱ्या कारखान्यात भीषण स्फोट झाला. या स्फोटात सहा जणांचा मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी तातडीनं नागपुरातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. हा अपघात आज दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घडला. स्फोट झाला तेव्हा कारखान्यात १० लोक काम करत असल्याचं सांगण्यात येत आहे.

दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर नागपूरमध्ये आयोजित केलेला स्वागत उत्सव स्थगित करावा, असं आवाहन गडकरी यांनी कार्यकर्त्यांना केलं आहे.

****

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी गेल्या सहा दिवसांपासून सुरु असलेलं उपोषण आज स्थगित केलं आहे. सरकारी शिष्टमंडळानं आज अंतरवाली सराटी इथं जाऊन जरांगे यांची भेट घेतली, त्यानंतर जरांगे यांनी हा निर्णय घेतला. या शिष्टमंडळात मंत्री शंभुराज देसाई, नवनियुक्त खासदार संदीपान भुमरे, आमदार राणा जगजितसिंह यांचा समावेश होता. सगेसोयरेसंदर्भातली आपली मागणी राज्य सरकारनं मान्य करावी ही भूमिका जरांगे यांची असून त्यासाठी आठ जूनपासून जरांगे यांचं उपोषण सुरु होतं. सरकारला एक महिन्याचा वेळ द्यावा, मागण्यासंदर्भात

एक महिन्यांत सरकार निर्णय घेईल, असं आश्वासन देसाई यांनी यावेळी दिलं. यावर जरांगे यांनी सहमती दर्शवत उपोषण स्थगित करत असल्याचं सांगितलं.

****

राज्याचा दीर्घकालीन विकास डोळ्यासमोर ठेऊन राज्यात विविध विभागांमार्फत विकासकामं सुरु असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. आज मंत्रालयात झालेल्या उपमुख्यमंत्र्यांच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाच्या बैठकीत वरीष्ठ अधिकाऱ्यांशी ते संवाद साधत होते. नागरिकांच्या दृष्टीनं महत्वाच्या असणाऱ्या प्रत्येक प्रकल्पाला आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे, तसंच नागरिकांना विकासकामांचा प्रत्यक्ष लाभ होण्यासाठी राज्यात चालू, प्रगतीपथावरील आणि प्रस्तावित विकासकामं नियोजनानुसार ठरलेल्या वेळेत गतीनं पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

****

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळालं असलं तरी आगामी विधानसभा निवडणुकीत आघाडी म्हणून लढताना गुणवत्तेनुसार, जागा वाटप झाले तर चांगला निकाल लागू शकतो असं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. नागपूर इथं आज ते वार्ताहरांशी बोलत होते. काँग्रेस पक्ष महाविकास आघाडी म्हणूनच विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

****

राज्यसभेच्या एका जागेसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत आज त्यांच्याशिवाय इतर कुणीही अर्ज भरलेला नाही, त्यामुळे राज्यसभा निवडणुकीत बिनविरोध निवडून येण्याचा सुनेत्रा पवार यांचा मार्ग मोकळा झाला आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कोणीही नाराज नाही. सर्वांच्या सहमतीनं सुनेत्रा पवार यांचा राज्यसभेसाठी आज अर्ज दाखल केला आहे, असं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल यांनी स्पष्ट केलं. सुनेत्रा पवार यांचा राज्यसभेसाठी अर्ज दाखल केल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

****

विधानपरिषदेच्या चार जागांसाठी २६ जून रोजी निवडणूक होणार आहे. यामध्ये मुंबई पदवीधर मतदारसंघ, कोकण पदवीधर मतदारसंघ, मुंबई शिक्षक मतदार संघ आणि नाशिक शिक्षक मतदारसंघाचा समावेश आहे. यातील मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी शिवसेनेने आज आपला उमेदवार घोषित केला आहे. शिवसेनेतर्फे उमेदवार म्हणून शिवाजी शेंडगे यांचं नाव घोषित करण्यात आलं आहे.

****

मराठवाड्यातील शेतकरी बदलत्या हवामानामुळे त्रस्त झाला आहे, ही भूमी पाण्याच्या बाबतीत आत्मनिर्भर व्हावी, यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठानं पाणी विषयावर अधिक भर देऊन लोकांचं जीवनमान उंचवावं, अशी अपेक्षा विद्यापीठाचे कुलपती तथा राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केली.

छत्रपती संभाजीनगर इथं विद्यापीठाच्या ६४व्या दीक्षांत समारोहात त्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन केलं. दीक्षांत सोहळ्यात ४१ संशोधकांना कुलगुरुंच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली असून ३ हजार ४२ विद्यार्थांना विद्यापीठाच्या वतीनं पदवी प्रदान करण्यात आली आहे.

****

शेतकऱ्यांना पिक कर्ज नाकारली जात आहेत, असा आरोप करत, आज छत्रपती संभाजीनगर इथं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं आंदोलन करण्यात आलं. शहरातील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या विभागीय कार्यालयासमोर विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन झालं.

****

कंत्राटदाराकडून मागील आठ ते बारा महिन्यांचं वेतन रखडल्यानं बीड नगरपालिकेत पाणी पुरवठा करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आजपासून पाणी पुरवठा करण्याचं काम बंद करत बेमुदत उपोषण सुरू केलं आहे.वेतनाबाबत वारंवार मागणी करुनही वेतन कंत्राटदार किंवा पालिकेकडून ते मिळत नसल्याचा आरोप या कर्मचाऱ्यांनी केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

धुळे शहराजवळील अवधान औद्योगिक वसाहतीला पाणी पुरवठा करणाऱ्या तलावातील पाणीसाठा संपल्यानं या औद्योगिक वसाहतीतील सुमारे ४०० उद्योग बंद पडले आहेत. त्यामुळे या उद्योगांना पाणीपुरवठा करण्यासाठी एमआयडीसी तलावात

शिल्लक असलेला मृतसाठा अतिरिक्त पंप वापरून उचलण्याचा प्रयत्न करण्यात यावा, असा निर्णय जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या उपस्थितीत आज झालेल्या उद्योजकांच्या बैठकीत करण्यात आला आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी गोयल यांनी प्रशासनाला यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

****

राज्य परिवहन महामंडळामध्ये काम करणाऱ्या चालक-वाहकांपासून ते अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या विनंती बदल्या यापुढे संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीनं होणार आहेत. अशी माहिती राज्य परिवहन महामंडळाच्या जनसंपर्क विभागाच्या वतीनं आज देण्यात आली. एसटी महामंडळात सध्या ८७ हजार कर्मचारी कार्यरत आहेत. संगणकीय प्रणालीमुळे होणाऱ्या बदल्यांसंदर्भात कर्मचाऱ्यांचे आक्षेप कमी होणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

बोंड अळीपासून संरक्षित असलेल्या आणि कृषी विभागानं शिफारस केलेल्या तसंच कमी कालावधीत परीपक्व होणाऱ्या बीटी कापूस वाणांची लागवड करण्याचं आवाहन नांदेड जिल्हा कृषी अधीक्षकांनी केलं आहे. पेरणी करतानाच आपल्या कपाशीवर बोंड अळी येणार नाही याची काळजी शेतकऱ्यांनी घ्यावी असंही याबाबतच्या सूचनात म्हटलं आहे. एका गावात एकाच वानाची लागवड झाल्यास किड नियंत्रण करणं आणखी सोपे होत असल्याची माहितीही कृषी विभागानं दिली आहे.

****

येत्या २९ जुलै ते ३० ऑगस्ट २०२४ या कालावधीत सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली इथं विशेष लोक अदालतीचं आयोजन करण्यात आलं आहे. नांदेड जिल्ह्यातील नागरिकांनी त्याचा लाभ घेण्याचं आवाहन विधी विभागानं केलं आहे.

****